पोलिस आयुक्त मुंबई

नियुक्ती सूचना क्रमांक                                   दिनांक २२/०८/२०२२

# -: मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती २०१९ :-

**-: दि. २५/०८/२०२२ रोजी सकाळी ०९.०० वा. नियुक्ती आदेश स्विकारण्यासाठी येणाऱ्या उमेदवारांसाठी सूचना :-**

विषय:-मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती २०१९
पोलीस शिपाई पदावर अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत

संदर्भ:- १) महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक, पोलीस शिपाई चालक, सेवाप्रवेश (नियम) २०१९
२) मुंबई पोलीस शिपाई (चालक) अंतरिम निवड प्रसिध्द दिनांक ३०/१०/२०२१

उपरोक्त संदर्भानुसार मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती २०१९ भरती प्रक्रिया पार पाडण्यात आली. संदर्भ क्र. १ व २ नुसार कागदपत्र पडताळणी व भरती निकषाच्या अधिन राहून गुणवत्तेनुसार पोलीस शिपाई यांची तात्पुरती अंतरिम निवड यादी/अंतरिम प्रतिक्षा यादी (Provisional Select/Waiting List) जाहिर करण्यात आली आहे. तद्नंतर उमेदवारांची वैद्यकिय तपासणी व चारित्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या सोबतच्या यादीतील उमेदवारांना कागदपत्र पडताळणी व भरती निकषाच्या अधिन राहून नियुक्ती पत्र स्विकारण्यासाठी बोलविण्यात येत आहे. नियुक्ती पत्र स्विकारण्याकरिता बोलविण्यात आले म्हणून नियुक्तीचा अधिकार प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर निवड रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास आहेत. यांची संबंधित उमेदवारांने नोंद घ्यावी. तसेच खाली नमुद केलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

**१) नियुक्तीसाठी येताना कागदपत्र पडताळणीकरिता खालील नमूद प्रमाणपत्र न चुकता सोबत आणणे आवश्यक आहे :-**

१) भरती ओळखपत्र ( मैदानी चाचणी /लेखी परिक्षेचे )

२) भरती प्रक्रियेसाठी यापूर्वी जमा न केलेले सर्व मुळ कागदपत्र
उदा. शैक्षणिक /डोमीसाईल /जातप्रमाणपत्र / नॉन क्रिमीलेअर / होमगार्ड / प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त इत्यादि संबंधित मुळ प्रमाणपत्र.

३) ०४ पासपोर्ट साईज फोटो.

४) आधार कार्ड व पॅन कार्ड

५) दैनंदिन गरजेच्या वस्तू घेवून पोलीस प्रशिक्षणाच्या तयारीने न चुकता हजर रहावे.

सोबत नियमीत वापरण्यास लागणारे कपडे, विश्रांतीकरिता साहित्य (दरी, मच्छरदाणी, पांघरुण), ताट-वाटी, तांब्या, ग्लास, दाढीचे साहित्य (पुरुषांकरिता), २ खाकी हाफ पॅन्ट, २ पांढऱ्या बनियान, कॅनव्हास शुज (१ जोडी), खाकी नायलॉन सॉक्स (२ जोडी), २०० पानी वह्या (२), १ पेन, गांधी टोपी, १ लोखंडी बकेट, महिलांकरिता २ ट्राऊझर, २ पांढरे टी-शर्ट, इत्यादी साहित्य सोबत आणावे. सोबत 'मेस ॲडव्हान्स' रू.२०००/- घेवून यावे. तसेच संपर्कासाठी दिलेला मोबाईल क्रमांक व ई मेल आयडी अद्ययावत ठेवावा. **उमेदवाराने आपल्यासोबत चैनीच्या वस्तू किंवा किंमती वस्तू उदा. सोन्याचे दागिने इत्यादी वस्तू आणू नयेत. अशा वस्तू हरविल्यास किंवा चोरीला गेल्यास कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

**२) विशेष सूचना:-**

१) भरती ओळखपत्र नसल्यास अथवा अपूर्ण कागदपत्रे/प्रमाणपत्रे असल्यास नियुक्ती देण्यात येणार नाही. नियुक्तीसाठी दिलेल्या दिनांकाच्यावेळी गैरहजर राहिल्यास पूर्व सूचना न देता निवड रद्द करण्याबाबतची कारवाई करण्यात येईल यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी व न चुकता हजर रहावे. सदरची पोलीस शिपाई पदाची अस्थायी नियुक्ती ही नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीच्या अधिन आहे व सदरहू अटी व शर्ती उमेदवारांस बंधनकारक आहेत.

२) ''कोविड-१९'' अनुषंगाने सर्व उमेदवारांनी नियुक्तीपत्र स्विकारण्यासाठी येतांना २४ तासाच्या आतील 'ॲन्टीजन चाचणी' अहवालाची प्रिंट सोबत आणणे अनिवार्य आहे. तसेच उमेदवारांनी नियुक्तीपत्र स्वीकारण्यासाठी हजर होते वेळी तसेच प्रशिक्षण कालावधीत शासनाच्या सर्व ''कोविड-१९'' विषयक मार्गदर्शक सूचनाचा अवलंब करणे अनिवार्य असेल.

**टिप:-**

नियुक्तीसाठी बोलविण्यात आलेल्या उमेदवारांने तसेच भरती निकषांची/अर्हतेची पुर्तता न केल्याचे आढळुन आल्यास नियुक्ती दिली जाणार नाही व निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

**( शाम घुगे )**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२)
पोलीस आयुक्त कार्यालय बृहन्मुंबई.

# मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती २०१९

(पोलीस शिपाई पदावर अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत )

दिनांक २५/०८/२०२२ सकाळी ०९.०० वा नियुक्तीसाठी 'पोलीस संकुल नायगांव' नायगांव पोलीस मुख्यालय, (पोलीस भरती संगणक कक्ष), नायगांव, दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४ येथे कागदपत्र पडताळणी व भरती निकषाच्या अधिन राहून बोलविण्यात आलेल्या उमेदवारांची यादी

| Sr No. | Chest No | ROLL NO | CANDIDATE NAME |
|---|---|---|---|
| 1 | 6 | 1010202568 | SUMIT GOPAL DHONDE |
| 2 | 25 | 1010202400 | SANTOSH DILIP NAMDAS |
| 3 | 817 | 1012621312 | GANESH SANTOBA YAMGAR |
| 4 | 976 | 1011716452 | RUTUJA LAXMAN SOUNDALKAR |
| 5 | 981 | 1011716378 | PAVITRA BAPU GAME |
| 6 | 986 | 1011716242 | SUJATA BAJIRAO MASALKAR |
| 7 | 987 | 1011716470 | AARATI REVANNATH KARDILE |
| 8 | 993 | 1011716741 | SONU UTTAM GAIKWAD |
| 9 | 1008 | 1011716667 | SNEHAL MOHAN HAJARE |
| 10 | 1017 | 1011716794 | PALLAVI PURUSHOTTAM DIMKE |
| 11 | 1019 | 1011716444 | KAJAL LAXMAN JADHAV |
| 12 | 1058 | 1010101524 | VISHAL TUKARAM ALHAT |
| 13 | 1060 | 1012219373 | NAVNATH LAXMAN SARAK |